# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

## दिनांकः02.07.2025 वारःबुधवार

---

-आर्थिक लाभाच्या फसव्या योजनांच्या बाबतीत नागरिकांनी दक्षता घेण्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं आवाहन

-पीकविम्यासंदर्भात दोषी विमा कंपन्यांवर कठोर कारवाई केली जाईल - कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांची ग्वाही

-रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी रोजगार-संबंधित प्रोत्साहन योजनेला आणि राष्ट्रीय क्रीडा धोरण २०२५ ला केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता

-विकसित भारत अभियानात युवकांना सहभागी करून घेण्यासाठी केंद्र सरकारचा ‘विकसित भारत युवा कनेक्ट’ कार्यक्रम

-अँडरसन – तेंडूलकर चषक क्रिकेट कसोटी सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आजपासून बर्मिंगहॅम इथं सुरु होणार

**विधानसभा**

राज्यात अधिक व्याजदराचं आमिष दाखवून नागरिकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या योजनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिस विभागामार्फत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. नागरिकांनीही अशा प्रकारच्या योजनांना बळी न पडता योग्य ती दक्षता घ्यावी, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत केलं. भिमराव तापकीर यांनी उपस्थित केलेल्या प्रशाला उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले,

**बाईट – 29 सेकंद**

बीड इथल्या अल्पवयीन मुलीच्या लैंगिक शोषण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी वरिष्ठ महिला आयपीएस अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली ‘एसआयटी’ची स्थापन करण्यात येईल, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. दोषींवर कठोर कारवाई करून दोषींना पाठीशी घालणाऱ्यांवरही कारवाई करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

भिवंडी शहर आणि परिसरात आशिया खंडातील सर्वात चांगला लॉजिस्टीक हब निर्माण होऊ शकतो, यातून रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील. या भागाचा सुनियोजित विकास करण्यासाठी उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात येईल, असं उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत सांगितलं.

राज्यात क्षयरोग निर्मूलनासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत असून संशयित क्षयरुग्ण शोधून त्यांच्यावर तत्काळ उपचार करण्यावर भर देण्यात येत आहे, अशी माहिती आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी विधानसभेत दिली.

**<u>विधानपरिषद</u>**

राज्य शासनाच्या वाळू धोरणाअंतर्गत घरकुलांसाठी स्थानिक वाळू घाटांमधून पाच ब्रास वाळू मोफत उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तहसीलदारांमार्फत ही वाळू लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवली जाणार आहे, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषदेत दिली. स्थानिक ग्रामपंचायती, नगरपंचायती आणि खासगी बांधकामांसाठी देखील ठराविक दरानं वाळू उपलब्ध करून देणार असल्याचं बावनकुळे यांनी सांगितलं.

**<u>कृषीविषयक</u>**

पीकविम्यासंदर्भात दोषी ठरलेल्या विमा कंपन्यांवर कठोर कारवाई केली जाईल आणि अशा कंपन्या शासनाच्या काळ्या यादीत टाकल्या जातील, असं कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी विधानपरिषदेत सांगितलं.

राज्यात मार्च-एप्रिल आणि मे महिन्यात पावसामुळे नुकसान झालं असून याबाबतचे पंचनामे पूर्ण होताच शासनाच्या धोरणानुसार मदतीचं वाटप करण्यात येईल, अशी माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली.

राज्यात वीज पडून 63 जणांचा मृत्यू झाला असून त्यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी 4 लाखांची मदत देण्यात येत आहे, तसंच एकंदर 75 हजार हेक्टर क्षेत्र बाधित झालं असून सुमारे 213 कोटी रुपयांची नुकसान भरपाई अपेक्षित आहे, असं जाधव-पाटील यांनी सांगितलं.

अन्नपदार्थांची घरपोच सेवा देत असलेल्या कंपन्यांच्याबाबत नागरिकांना तक्रारी दाखल करण्यासाठी लवकरच टोल फ्री क्रमांक घोषित करण्यात येईल, असं अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधानपरिषदेत सांगितलं.

ई-कॉमर्स आस्थापनांच्या सखोल तपासणी दरम्यान अस्वच्छता तसंच गोदामात मुदत संपलेले खाद्यपदार्थ आढळून आल्याच्या पार्श्वभूमीवर  तत्काळ कारवाई करण्यात येत आहे. या गोदामांच्या तपासण्या वाढविण्यात येत असल्याचं झिरवाळ यांनी सांगितलं.

**<u>उर्जा-मुख्यमंत्री</u>**

येत्या काळात अपारंपरिक ऊर्जा स्रोतांचं महत्त्व आणि आवश्यकता वाढणार आहे. या पार्श्वभूमीवर उदंचन जलविद्युत प्रकल्प म्हणजेच पंपस्टोरेज हा प्रकल्प अपारंपरिक ऊर्जा स्रोतात भर घालेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत व्यक्त केला. उदंचन जलविद्युत प्रकल्पांसाठी जलसंपदा विभाग आणि तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी नवशक्ती निर्माण संस्था मर्यादित यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला, त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. सहकारातून अशा पद्धतीचा प्रकल्प पहिल्यांदाच राज्यात होत आहे, असं फडणवीस यांनी सांगितलं.

**<u>रिपोर्टर</u>**

आकाशवाणी पुणे केंद्राच्या प्रादेशिक वृत्त विभागामध्ये कॅज्युअल रिपोर्टर या अस्थायी पदासाठी सूचि तयार करण्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत. यासाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख २० जुलै आहे. सविस्तर माहिती आणि अर्ज करण्यासाठी newsonair.com या वेबसाईटवर vacancies या टॅबला भेट द्यावी. वृत्त विभागाच्या ०२०-२५५ १० ५०६ या क्रमांकावर देखील संपर्क साधता येईल.

**<u>केंद्रियमंत्रीमंडळ</u>**

देशात रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी सुमारे एक लाख कोटी रुपयांच्या रोजगार-संबंधित प्रोत्साहन योजनेला काल केंद्रीय मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. दोन वर्षांच्या कालावधीत देशात साडे तीन  कोटींहून अधिक नोकऱ्या निर्माण करण्यास प्रोत्साहन देण्याचा उद्देश या योजनेमागे आहे. यापैकी सुमारे दोन कोटी लाभार्थी हे प्रथमच कामास सुरवात करणारे असतील. या योजनेचे फायदे १ ऑगस्ट २०२५ ते ३१ जुलै २०२७ दरम्यान निर्माण झालेल्या नोकऱ्यांना लागू होतील. उत्पादन क्षेत्रातील आस्थापनांना यासाठी अनुदान दिलं जाणार असून या क्षेत्राला योजनेचा सर्वाधिक फायदा होईल, असं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बैठकीनंतर पत्रकारांना सांगितलं.

केंद्रीय मंत्रिमंडळानं संशोधन विकास आणि नवोन्मेष योजनेलाही मंजुरी दिली. यासाठी एक लाख कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

याशिवाय राष्ट्रीय क्रीडा धोरण २०२५ ला देखील केंद्रीय मंत्रिमंडळानं मान्यता दिली. क्रीडा क्षेत्रात जगातल्या पहिल्या पाच देशांत स्थान मिळवण्याचं उद्दिष्ट या धोरणामागे आहे. युवकांमधील क्रीडा गुण ओळखून त्यांना दर्जेदार प्रशिक्षण देणे, उत्तम क्रीडांगणे किंवा क्रीडा प्रबोधिनींची स्थापना करणे, खेळांचे सामने आयोजित करून खेळाडूंना सतत संधी उपलब्ध करून देणे आणि क्रीडाविषयक जाणीव लोकांमध्ये निर्माण करणे, अश्या विविध पैलूंचा या धोरणात विचार करण्यात आला आहे.

**<u>युवा-कनेक्ट</u>**

विकसित भारत अभियानात युवकांना सक्रीय सहभागी करून घेण्यासाठी केंद्र सरकारनं 'विकसित भारत युवा कनेक्ट' हा कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. याचा शुभारंभ 12 ऑगस्ट 2025 रोजी संपूर्ण देशभर एकाच दिवशी होणार असून, या कार्यक्रमास पंतप्रधान नरेंद्र मोदी संबोधित करणार आहेत, अशी माहिती केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी काल  दिली. मांडवीय यांनी सर्व राज्यांच्या क्रीडा मंत्री आणि सचिवांशी दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधला. देशातील युवकांचा विकसित भारत अभियानात जास्तीत जास्त सहभाग वाढवावा, विविध उपक्रमांद्वारे त्यांची सामाजिक जाणीव वाढावी, तसंच क्रीडा क्षेत्रात त्यांची रुची वाढावी आणि त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी मिळावी यासाठी 'विकसित भारत युवा कनेक्ट' कार्यक्रमा अंतर्गत विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात यावं, अशा सूचना मांडवीय यांनी दिल्या.

**<u>चव्हाण</u>**

भारतीय जनता पार्टीचे नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून रवींद्र चव्हाण यांची बिनविरोध निवड झाली. मुंबईतल्या वरळी इथं काल झालेल्या राज्य  परिषदेच्या अधिवेशनात केंद्रीय मंत्री किरण रिजीजू यांनी चव्हाण यांना निवडीचं प्रमाणपत्र प्रदान केलं. चव्हाण यांनी मावळते प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून पदाची सूत्रं स्वीकारली.

क्रिकेट

अँडरसन – तेंडूलकर चषक क्रिकेट कसोटी सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आज बर्मिंगहॅम इथल्या एजबस्टन इथं सुरु होणार आहे. पहिला सामना गमावल्यानंतर भारत चांगल्या कामगिरीच्या अपेक्षेत असला, तरी संघाला कदाचित जसप्रीत बुम्राची अनुपस्थिती  जाणवणार आहे.

**<u>गडचिरोली</u>**

गडचिरोली जिल्ह्यात सततच्या पावसामुळे सहा मार्गांवरील वाहतूक ठप्प झाली आहे. खोब्रागडी, सती, वैचोलना, कठाणी नद्यांना पूर आले असून जनजीवन विस्कळित झालं आहे.

<u>**हवामान**</u>

राज्यात सर्वत्र पावसाच्या सरींची शक्यता वर्तवण्यात आली असून मध्य महाराष्ट्र आणि कोकणात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे.

शेवटी पुन्हा ठळक बातम्या

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.